जा.क्र. जि.प.मु.सा./ ७९ /२०२२
जि.प. मुद्रणालय सातारा
दिनांक : २१ /०१/२०२२

प्रति

**विषय : जिल्हा परिषद मुद्रणालयामधील एचएमटी कंपनीचे २३''x ३६'' आकाराचे एसओएम १३६ मशिनच्या दुरुस्तीचे दरपत्रक मिळणेबाबत...**

सातारा जिल्हा परिषद मुद्रणालयातील एसओएम १३६ एचएमटी मशिनचे खालील तपशिलात नमुद केल्यानुसार दुरुस्तीचे काम करुन घेणेचे असुन आपण किंवा आपला प्रतिनिधी मुद्रणालयाच्या कार्यालयीन वेळेत मशिनची तपासणी करुन खालील प्रमाणे आणि इतर आवश्यक असणाऱ्या संभाव्य दुरुस्तीसाठी आपण किती दराने काम करण्यास तयार आहात याचे दरपत्रक दि. ०४/०२/२०२२ रोजी मुद्रणालयाच्या कार्यालयीन वेळेत समक्ष अथवा पोस्टाने पोहोच होईल अशा पद्धतीने सादर करावे. विहीत मुदतीत प्राप्त होणारी दरपत्रके स्विकारली जातील तद्नंतर प्राप्त होणारी दरपत्रके स्विकारली जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

| अ.क्र. | तपशिल | दर रुपये |
|---|---|---|
| १ | **एचएमटी कंपनीचे २३''x ३६'' आकाराच्या एसओएम १३६ मशिनच्या खालील नुसार दुरुस्तीच्या मजूरीचा खर्च**<br>मशिन खोलणे, सर्व्हिसिंग, दुरुस्ती<br>स्विंग ग्रिपर, डिलीव्हरी, इंक रोल असेंब्ली,<br>डॅम्पींग रोल असेंब्ली उघडणे आणि<br>नवीन रबराईजींग केल्यानंतर परत बसविणे, सेट करुन देणे<br>आणि पूर्ववत मशिन सुस्थितीत सुरु करुन देणे | |

## अटी व शर्ती

१) जिल्हा परिषद मुद्रणालयामध्ये समक्ष येऊन मशिनची पहाणी करुन वरील प्रमाणे दुरुस्तीचे काम करणेचे आहे. तसेच मशिनच्या पहाणी मध्ये आढळलेले इतर दुरुस्तीचे काम आणि मशिन खोलल्यानंतर संभाव्य दुरुस्ती कामाचा अंदाज घेऊन तसे दरपत्रकात नमूद करुन केवळ मजूरीचे दर देणेचे आहे.

२) मशिन खोलल्यानंतर नादुरुस्त झालेले भाग बदलणेसाठी ते भाग तयार करुन घेणे अथवा बाजारपेठेतुन उपलब्ध करुन देणेचे आहेत. मशिनचे भाग दुरुस्तीसाठी घेऊन जाणे आणि परत घेऊन येणेसाठी होणारा खर्च हा मुद्रणालय शासकीय कार्यपद्धतीचा अवलंब करुन करणार आहे.

३) मशिन खोलल्यानंतर मशिन पूर्ववत सुस्थितीत सुरु करुन देणेचा कालावधी नमुद करणेचा आहे.

५) मशिन दुरुस्ती ही समाधानकारक न झाल्यास देयकाची अदायी होणार नाही. तसेच मुद्रणालयाच्या होणाऱ्या नुकसान भरपाईस व मा. मुख्य कार्यकारी अधिकारी ठरवतील त्यानुसार दंडास आणि कायदेशीर कारवाईस निविदाधारक पात्र ठरेल.

६) सिलबंद दरपत्रके उघडण्याची वेळेस आपला प्रतिनिधी अथवा आपण समक्ष हजर रहाणेचे आहे. त्यानुसार आपण उपस्थित न राहिलेस कोणतीही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

७) दरपत्रकामध्ये खाडाखोड करु नये, लखोट्यावर 'एसओएम १३६ ऑफसेट मशिन दुरुस्तीचे दरपत्रक' असा उल्लेख असावा.

८) एक किंवा सर्वच दरपत्रक स्विकारण्याचे अथवा नाकारण्याचे अधिकार, तसेच अटी व शर्तींमध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करण्याचे अधिकार खाली सही करणार यांनी राखुन ठेवलेले आहेत.

९) दरामध्ये जीएसटी किंवा इतर करांचा समावेश केला जाऊ नये तो स्वतंत्र बिलामध्ये आकारावा.

१०) सशर्त दरपत्रक स्विकारली जाणार नाही.

19.01.

**प्रमुख नियंत्रक**
सातारा जिल्हा परिषद मुद्रणालय, तथा
**मुख्य लेखा व वित्त अधिकारी**
सातारा जिल्हा परिषद